# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.
## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.)

**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.२०२०/आ.व्य./को.वि.उपाययोजना/कावी- 258

दि.२६.०५.२०२०

**विषय: कोरोना विषाणू (COVID-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**वाचा: १.आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार.**
**२.साथ रोग प्रतिबंध कायदा १८९७ नुसार.**
**३.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ मधील तरतुदीनुसार**
**४.महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन आदेश क्र.DMU/2020/CR.92/DisM-1, Dt.19.05.2020.**

<u>आदेश</u>

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड १९) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी कोरोना विषाणूच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या lockdown अन्वये संदर्भ क्र.४ च्या आदेशानुसार जिल्ह्यात करावयाच्या उपाययोजना बाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली मला प्राप्त अधिकारा नुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता यापूर्वीचे दुकान व उद्योग सुरु ठेवण्याचे सर्व आदेश रद्द करून संदर्भीय आदेश क्र.४ नुसार खालीलप्रमाणे प्रतिबंधीत व प्रतिबंध मुक्त करावयाचे आदेश निर्गमित करीत आहे.

**प्रतिबंधीत:**

1. शाळा, महाविद्यालये, शैक्षणीक, प्रशिक्षण संस्था, कोचिंग क्लासेस (खाजगी शिकवणी वर्ग) हे बंद राहतील. Online शिकवणी साठी परवानगी राहील.
2. हॉटेल, रेस्टॉरंट आणि आदरातीथ्य सेवा बंद राहतील. परंतु या सेवा आरोग्य, पोलीस, शासकीय अधिकारी/कर्मचारी, वैद्यकीय कर्मचारी/ अडकून पडलेले व्यक्ती व पर्यटक आणि अलगीकरण केंद्रात सुरु असलेल्या सेवा व बस स्थानक व रेल्वे स्थानकावरील चालू असलेल्या हॉटेल सेवा (सुरु राहतील) यांना लागू राहणार नाहीत. हॉटेल, रेस्टॉरंट व खानावळ यांच्या सेवा फक्त घरपोच वितरणासाठी (पार्सल) सुरु ठेवता येतील.
3. सर्व सिनेमा गृह, केस कर्तनालय, स्पा, Shopping Mall, व्यायामशाळा, जलतरण पूल, करमणुकीचे ठिकाणे, थिएटर, बार, Auditoriums, Assembly Hall इत्यादी बंद राहतील.
4. सर्व सामाजिक, राजकीय, क्रिडा विषयक, करमणूक विषयक, शैक्षणीक, सांस्कृतिक, धार्मिक व मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येऊन साजरे होणारे कार्यक्रम घेण्यावर बंदी राहील.
5. सर्व धार्मिक व प्रार्थना स्थळे सर्व नागरिकांसाठी व धार्मिक कार्यक्रमासाठी बंद राहतील.

**प्रतिबंध मुक्त:**
**वरील प्रतिबंधीत मध्ये नसलेल्या सर्व बाबी खालीलप्रमाणे सुरु ठेवता येतील.**

1. क्रिडा संकुल, क्रिडा मैदाने व इतर सार्वजनिक खुली मैदाने वैयक्तिक व्यायामा करिता चालू राहतील परंतु प्रेक्षक व सामुहिक कार्यक्रमासाठी अशा ठिकाणी बंदी असेल. सर्व शारीरिक व्यायाम व इतर हालचाली सामाजिक व सुरक्षित अंतर ठेवून करता येतील.
2. सर्व खाजगी व सार्वजनिक वाहतूक करताना दोनचाकी वाहन केवळ १ व्यक्ती साठी, तीन चाकी वाहन १+२ व्यक्तीसाठी व चारचाकी वाहन १+२ व्यक्तींसाठी वापर करता येतील.

Scanned by CamScanner

3. जिल्हा अंतर्गत बस वाहतूक सेवा, प्रती बस वाहन क्षमतेच्या ५०% पर्यंतच्या मर्यादेत शारीरिक व सामाजिक अंतराचे पालन करून व Sanitization Measures चे पालन करून सुरु करता येईल.

4. **Containment Zone मधील गावे व भाग व वरील प्रतिबंधीत वगळून जिल्हा अंतर्गत सर्व दुकाने, उद्योग, व्यवसाय, आस्थापना दररोज सकाळी ९.०० ते ५.०० यावेळेत खालील अटीच्या अधीन राहून सुरु ठेवता येतील. शिवाय रात्री ७.०० ते सकाळी ७.०० यावेळेत जिल्हयात संपूर्ण संचार बंदी लागू असेल.**

**अटी:**

१. दुकानातील मालक, कर्मचारी, ग्राहक व इत्यादी यांच्या चेहऱ्यावर मास्क घालणे बंधनकारक राहील.

२. सार्वजनिक ठिकाणी, दुकानाच्या व आस्थापनाच्या परिसरात व इतर ठिकाणी थुंकल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

३. सार्वजनिक ठिकाणे तसेच दुकानच्या परिसरात सामाजिक अंतर राहणे बंधन कारक असेल.

४. सार्वजनिक ठिकाणी तसेच दुकानच्या परिसरात मद्यपान, तंबाकू, गुटखा, पान इत्यादीचे सेवनास प्रतिबंध असेल.

५. एकावेळेस दुकानात ५ पेक्षा जास्त ग्राहकास प्रवेश राहणार नाही. तसेच दुकानाबाहेर १ मीटर अंतरावर ग्राहकांना उभे राहण्यासाठी गोल/चौकोन आखून द्यावे.

६. कामाच्या ठिकाणी/दुकानात प्रवेशापूर्वी Handwash, Sanitizer चा वापर करणे दुकानातील मालक, कर्मचारी, ग्राहक व इत्यादीना बंधनकारक असेल.

७. दुकान/आस्थापना/उद्योग इत्यादी ठिकाणी मानवी संपर्कात येणाऱ्या सर्व वस्तू/ ठिकाणाचे वेळोवेळी नियमित निर्जंतुकीकरण करणे बंधनकारक असेल.

८. ग्राहकाकडून खरेदी नंतर पैशाची देवाण घेवाण RBI च्या सुचनेनुसार E-Vallets व Swipe machine द्वारे करणेस भर द्यावा.

वरीलप्रमाणे हा आदेश दि.२६.०५.२०२० रोजी माझ्या सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

यानुसार या आदेशाची आवज्ञा करणाऱ्या संबंधीताने भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अंतर्गत संबंधितावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

**प्रतिलिपी:**

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. पोलीस अधीक्षक, हिंगोली. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
४. उपविभागीय अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
५. तहसीलदार हिंगोली/कळमनुरी/औंढा ना./वसमत/सेनगाव यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. मुख्याधिकारी न.पा.-न.पं हिंगोली/कळमनुरी/वसमत-सेनगाव/औंढा ना. यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. सर्व संबंधीत शासकीय विभाग प्रमुख यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
८. जिल्हा माहिती अधिकारी हिंगोली. यांना वरीलप्रमाणे प्रसिद्धीसाठी.

**(रुचेश जयवंशी, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, हिंगोली.**

जिल्हा दंडाधिकारी हिंगोली

Scanned by CamScanner